# अकोला पोलीस



## प्रेस नोट

पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला.
दिनांक : ०६/०६/२०१८

### प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेसाठी पोलीस दलाचे योगदान

अकोला जिल्हयातील जास्तीत जास्त गरजू लोकांना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेचा लाभ मिळावा, यासाठी मा.जिल्हाधिकारी श्री. आस्तिककुमार पाण्डेय हे मोठया प्रमाणात उपक्रम राबवित आहेत. सदर अपघात विमा योजनेचा लाभ जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था पाहणारे महत्वाचे असे पोलीस दलातील सर्व कर्मचाऱ्यांना यात समाविष्ट करण्याच्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी हे प्रयत्नरत आहेत. त्यानूसार जिल्हयातील सर्व पोलीस कर्मचाऱ्यांना सदर फॉर्मचे वाटप करण्यात आले आहे. मा. जिल्हाधिकारी यांच्या सदर प्रयत्नास व पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या विमा काढण्यासाठी हातभार म्हणून मा.पोलीस अधीक्षक श्री. एम.राकेश कलासागर यांनी जिल्हयातील सर्व पोलीस अधिकाऱ्यांना आवाहन करून मा.जिल्हाधिकारी यांच्या सहाय्य निधीस योगदान देण्याच्या दृष्टीने सर्व अधिकाऱ्यांनी पुढाकार घेवून एकूण रू. ३,२५,०००/- जमा केले व सदरची रक्कम आज दिनांक ०६/०६/२०१८ रोजी मा.जिल्हाधिकारी यांना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेच्या सहाय्य निधीसाठी सुपूर्त केली. सदर वेळी अपर पोलीस अधीक्षक श्री.विजयकांत सागर, उपजिल्हाधिकारी श्री. मोहिते, पोनि.(कल्याण) श्री. पी.जे.अबदागिरे हे उपस्थित होते.

सध्या १ जून ते ७ जून या दरम्यान पोलीस कल्याण सप्ताह चालू असून सदर कल्याण सप्ताहात पोलीस अधीक्षक श्री.एम.राकेश कलासागर यांनी पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी हे महत्वाचे पाऊल उचलले असून सदर विमा योजनेच्या अनुषंगाने अकोला जिल्हयातील सुमारे २०५० पोलीस कर्मचाऱ्यांचे फॉर्म भरण्यात आले असून जिल्हयातील सर्वच पोलीस कर्मचाऱ्यांना सदर विमा योजनेत सामावून घेतले जाणार आहे असे पोलीस अधीक्षक श्री. एम.राकेश कलासागर यांनी सांगितले.

(पी.जे.अबदागिरे)
प्र.पोलीस उपअधीक्षक (मुख्या.),
पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला

प्रति,

संपादक,

........................................................

........................................................

कृपया आपल्या दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.

# अकोला पोलीस

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

